# पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा.

## प्रेस नोट

क्रमांक-वानिशा/वाहतुक नियमन/अधिसूचना/२०१७-५९८ भंडारा दिनांक १५/१०/२०१७

प्रति,
जिल्हा माहिती अधिकारी,
भंडारा.

विषय :- भंडारा शहरातील वाहतुकीचे नियमन व नियंत्रण करण्यासंबंधीची अधिसुचना स्थानिक वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करण्याबाबत.

--..--

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यांत येते की, भंडारा शहरातील वाहतुकीचे नियमन व नियंत्रण करण्याकरीता शहरातील रस्त्यांवर जड वाहनांच्या वाहतुकीस बंदी, एकेरी वाहतुकीचे मार्ग निश्चीत करणे, सम-विषम तारखेस पार्कींग, नो-पार्कींग इत्यादी सुधारणा करणे आवश्यक असल्याने त्यानुसार दिनांक १४/०९/२०१७ रोजी प्रस्तावीत अधिसुचनेतील तरतुदी स्थानिक वर्तमानपत्रात जारी करण्यांत आलेल्या होत्या व भंडारा शहरातील स्थानिक नागरिक, व्यावसाईक, ऑटो चालक-माल वाहतुक संघटना यांचेकडून लेखी आक्षेप व सुचना दिनांक ३०/०९/२०१७ पर्यंत मागविण्यांत येवून प्राप्त झालेल्या सर्व आक्षेप व सुचनांसबंधी दिनांक ०७/१०/२०१७ रोजी पोलीस अधीक्षक कार्यालय भंडारा येथे बैठक आयोजीत करण्यांत आली होती. सदर बैठकीस १) श्री सुनिल मेंढे, अध्यक्ष न.प. भंडारा २) श्री प्रशांत हरीचंद्र लांजेवार सामाजीक कार्यकर्ते, शहरातील व्यापारी व इतर ऑटो चालक/मालक संघटनेचे सदस्य, इतर खात्यांचे शासकीय अधिकारी हजर होते. सदर बैठकीमध्ये प्राप्त झालेले हरकत/अर्ज व ऐनवेळी उपस्थित झालेले प्रश्न यांचेवर सविस्तर चर्चा करण्यांत आली व सदर हरकतीचे निराकरण करण्यांत आले.

त्याअंती प्रस्तावीत अधिसुचनेतील तरतुदीमध्ये सुधारणा करण्यांत येवून सदरची अधिसुचना दिनांक १६ /१०/२०१७ रोजी जारी करण्यांत आली आहे. सदरची अधिसुचना राजपत्रात प्रसिध्द होताच अधिसुचनेची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे आदेश सर्व शासकीय विभागांना देण्यांत आले आहेत.

करिता सदरची अधिसुचना स्थानिक वर्तमानपत्रात सतत ३ दिवस प्रसिध्दीसाठी द्यावे व प्रसिध्द केलेल्या अधिसुचना वर्तमानपत्रात प्रसिध्द झाल्यानंतर त्या वर्तमानपत्राच्या प्रती या कार्यालयास कृपया पाठवावे ही विनंती

**सहपत्र** :- अधिसुचना

(विनीता साहू)
पोलीस अधीक्षक,
भंडारा

पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा.

## अधिसूचना

क्रमांक-वानिशा/वाहतुक नियमन/अधिसूचना/२०१७- ५१७ भंडारा दिनांक १५ /१०/२०१७

--..--

ज्याअर्थी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३३(ब) नुसार सार्वजनिक ठिकाणी रस्त्यांवर करावयाचे नियमासाठी प्राप्त असलेल्या कायदेशीर अधिकारान्वये भंडारा शहरातील रस्त्यांवर जड वाहनांना वाहतुकीस बंदी, एकेरी वाहतुकीचे मार्ग निश्चीत करणे, सम-विषम तारखेस पार्कींग, नो-पार्कींग इत्यादी संदर्भात या कार्यालयाचे पत्र क्र. वानिशा/वाहतुक नियमन अधिसुचना/२०१७- ४५१ भंडारा दिनांक १४/०९/२०१७ अन्वये प्रेसनोट प्रसारीत करुन भंडारा शहरातील स्थानिक नागरिक, व्यावसाईक, ऑटो चालक-मालक वाहतुक संघटना यांचे काही लेखी आक्षेप किंवा सुचना दिनांक ३०/०९/२०१७ पर्यंत मागविण्यांत आल्या होत्या,

त्याअनुषंगाने प्राप्त झालेल्या सर्व आक्षेपाचे तसेच सुचनांचे सर्वांगीण विचार करण्यांत आलेला असून दिनांक ०७/१०/२०१७ रोजी बैठकीत सविस्तर उपस्थितीत नागरीकांशी चर्चा करण्यांत आली.

त्याअर्थी ***मी विनीता साहू पोलीस अधीक्षक, भंडारा*** आम्हास मुंबई पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३३(ब) नुसार प्राप्त असलेल्या कायदेशीर अधिकारान्वये रहदारीस अडथळा होवून जनतेस त्रास होवू नये, त्यांची गैरसोय होवू नये व अपघातासारखे प्रकार घडून जिवित किंवा वित्तहानी होवून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये म्हणून भंडारा शहरातील खालील उपाययोजना आज **दिनांक १६/१०/२०१७** रोजी पासून लागू करण्यांत येत आहे.

**१) भंडारा शहरात मालाची ने-आण करणा-या अवजड वाहनांना बंदी:-**

अ) त्रिमुर्ती चौक ते पोष्ट ऑफीस चौक ते गांधी चौक ते शास्त्री चौक पर्यंत.
**(वेळ सकाळी ०७.०० ते २१.०० वाजता पर्यंत अवजड वाहनांना बंदी राहील)**

ब) जिल्हा परिषद चौक ते राजीव गांधी चौक ते खामतलाव चौक ते शास्त्री चौक पर्यंत

क) नागपूर नाका ते राजीव गांधी चौक ते खामतलाव चौक ते शास्त्री चौक पर्यंत
(क्रमांक **ब व क** करिता **वेळ सकाळी ०७.०० ते १३.०० वाजता व १६.०० ते २१.०० वाजता पर्यंत अवजड वाहनांना बंदी राहील**)

सदर प्रवेश बंदी दरम्यान आतील मुख्य मार्गावर प्रवेश बंदीचे वेळेपुर्वी जाणारी अवजड वाहने रहदारीचे मार्गावर उभे करु माल, साहीत्य उतरविणार नाहीत. प्रवेश बंदी पुर्व प्रतिबंधित क्षेत्रात प्रवेश करणारी अवजड वाहने ही संबंधीत वाहन मालक किंवा व्यापारी, स्वमालकीचे खाजगी जागेत किंवा दुस-याचे जागेत संबंधीतांची परवानगी घेवूनच उभी करतील किंवा प्रवेश बंदीचे वेळेपुर्वी आपली वाहने बाहेर काढून घेतील.

२) **एकेरी वाहतुक** :-

अ) गांधी चौक ते पोष्ट ऑफीस चौकाकडे जाणारा मार्ग सर्व मोटार वाहनांकरीता एकेरी वाहतुक राहील.

ब) गांधी चौक, आदीत्य अणघा मल्टीस्टेट क्रेडीट को-ऑप.सोसायटी शाखा कार्यालय भंडारा समोरुन हेगडेवार चौकाकडे जाणा-या सर्व वाहनांकरीता एकेरी वाहतुक राहील.

क) पोष्ट ऑफीस चौक ते मुस्लीम लायब्ररी चौकाकडे जाणा-या सर्व वाहनांकरीता एकेरी वाहतुक राहील.

ड) मुस्लीम लायब्ररी चौक ते डॉ.कावरे हॉस्पीटल ते शामराव चौकाकडे जाणा-या सर्व वाहनांकरीता एकेरी वाहतुक राहील.

३) **दुचाकी वाहनांकरीता सम-विषम तारखेस पार्कींग व्यवस्था** :-

१) अ) पोष्ट ऑफीस चौक ते गांधी चौक - रस्त्याचे **उजवे** बाजूला सम तारखेला (उदा. २,४,६,८ वैगेरे)

ब) पोष्ट ऑफीस चौक ते गांधी चौक - रस्त्याचे **डावे** बाजूला विषम तारखेला (उदा. १,३,५,७ वैगेरे)

वरील मार्गावर दिवसा वेळ **सकाळी ०८.०० ते रात्री २२.०० वाजे** दरम्यान सर्व प्रकारचे तीन चाकी व चार चाकी मोटार वाहनांना उभे करण्यास बंदी राहील.

२) अ) गांधी चौकातील गुरुनानक इलेक्ट्रानिक्स पासून ते जैन दुध डेअरी - रस्त्याचे **उजवे** बाजूला सम तारखेला (उदा. २,४,६,८ वैगेरे)

ब) गांधी चौकातील आयडीबीआय बॅक अेटीएम पासून ते जैन दुध डेअरी रस्त्याचे **डावे** बाजूला विषम तारखेला (उदा. १,३,५,७ वैगेरे)

वरील मार्गावर दिवसा वेळ **सकाळी ०८.०० ते रात्री २२.०० वाजे** दरम्यान सर्व प्रकारचे तीन चाकी व चार चाकी मोटार वाहनांना उभे करण्यास बंदी राहील.

४) **नो-पार्कींग** :-

अ) बस स्थानक ते शिवाजी स्टेडियम प्रवेशव्दार पर्यंत व बस स्थानक ते सामान्य रुग्णालय कडे जाणा-या रस्त्यापर्यंत सर्व प्रकारचे मोटार बाहनांकरीता नो-पार्कींग राहील.

ब) पोष्ट ऑफीस चौक ते मुस्लीम लायब्ररी चौकापर्यंत रस्ता सर्व प्रकारचे मोटार वाहनांकरीता नो-पार्कींग राहील.

क) शामराव चौक पुर्व-पश्चिम रस्ता चौकाचे दोन्ही बाजूस ५० मिटर पर्यंत सर्व प्रकारचे मोटार वाहनांकरीता नो-पार्कींग राहील.

ड) गांधी चौकातून सर्व बाजूला जाणारे सर्व रस्ते चौकापासून ५० मिटर पर्यंत सर्व प्रकारचे मोटार वाहनांकरीता नो-पार्कींग राहील.

इ) शास्त्री चौकातून सर्व बाजूला जाणारे सर्व रस्ते चौकापासून ५० मिटर पर्यंत सर्व प्रकारचे मोटार वाहनांकरीता नो-पार्कींग राहील.

फ) मुस्लीम लायब्ररी चौकातून सर्व बाजूला जाणारे सर्व रस्ते चौकापासून ५० मिटर पर्यंत सर्व प्रकारचे मोटार वाहनांकरीता नो-पार्कींग राहील.

ग) राजीव गांधी चौकातून सर्व बाजूला जाणारे सर्व रस्ते चौकापासून ५० मिटर पर्यंत सर्व प्रकारचे मोटार वाहनांकरीता नो-पार्कींग राहील.

ह) जिल्हा परिषद चौकातून सर्व बाजूला जाणारे सर्व रस्ते चौकापासून ५० मिटर पर्यंत सर्व प्रकारचे मोटार वाहनांकरीता नो-पार्कींग राहील.

ई) नागपूर नाका चौकातून सर्व बाजूला जाणारे सर्व रस्ते चौकापासून ५० मिटर पर्यंत सर्व प्रकारचे मोटार वाहनांकरीता नो-पार्कींग राहील.